जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 FEB 2018
महाराष्ट्र टाईम्स

# 'उच्चशिक्षणात नावीन्याचा शोध हवा'

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'उच्चशिक्षणात नावीन्याचा शोध घेणे अनिवार्य आहे. संशोधनाची पहिली पायरी म्हणूनच उच्चशिक्षणाकडे पाहिले पाहिजे. महावीर महाविद्यालयात सातत्याने नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. त्यामुळे गुणवत्ता आणि नावीन्य यामध्ये नेहमी अग्रक्रमावर राहिले आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे ॲकॅडमिक ॲडव्हायझर डॉ. डी. आर. मोरे यांनी केले.

महावीर महाविदयालयाच्या बी. ए. बी. एड विभागातील इंग्रजी विभागातील डॉ. कल्पना गंगातीरकर आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या रिफ्लेक्शन या कथासंग्रहाचे प्रकाशन डॉ मारे यांचे हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे होते.



डॉ. डी. आर. मोरे

मोरे म्हणाले, 'इंग्रजी भाषेत कथा लिहिणे आणि त्या प्रकाशित होणे हे फार आभावाने घडते. विदयार्थ्यांनी आपल्या सर्जनशीलतेला फुंकर घालून रिफ्लेक्शनसारखा १३ कथांचा संग्रह प्रकाशित करून शिवाजी विद्यापीठाच्या क्षेत्रात इतिहास रचला.'

विद्यार्थ्यांनी राबविलेल्या या अभिनव उपक्रमांचे प्राचार्य डॉ. लोखंडे यांनी अभिनंदन केले. यावेळी विद्यार्थ्यांनी इंग्रजी कथेचे नाट्य-श्राव्य सादरीकरण केले. स्वागत डॉ. गंगातीरकर यांनी केले. परिचय प्रा. हेमंत पाटील यांनी, सूत्रसंचालन सम्राज्ञी कुलकर्णी हिने तर आभार प्रदर्शन अभया पाटील हिने केले.

13 FEB 2018 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# More subjects to come under 'secured delivery' system

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) held a workshop on secured remote paper delivery (SRPD) at Dhananjay Gadgil College, Satara on Monday. According to university officials, they are going to bring a few more subjects under the ambit of SRPD systen in addition to the 3,300 subjects that are already there.

Director of board of examinations and evaluation Mahesh Kakade told **TOI**, "The workshops are meant to give hands-on idea to the staff who do all the examination work."

The workshop at Sangli will be held at Shrimati Mathubai Garware Kanya Mahavidyalaya on Wednesday afternoon. Kolhapur district will conduct the session at Kamala College in the morning on the same day.

Along with the principals, two officials from the exam department should also be present compulsorily.

Kakade said that the varsity is expanding its scope of SRPD to other courses such



**Under the SRPD system, the examination department sends the papers directly to the examination centres in an encrypted format online. Nobody can decrypt the online copy of the paper. The authority is given two OTPs—one to decrypt the document and the other to download the copy.**

as BSc, BA, BBA, BCA and BVoc besides the pharmacy and engineering subjects that were already enlisted in the SRPD system.

He added that under SRPD, the examination department sends the papers directly to the examination centres in an encrypted format online. Nobody can decrypt the online copy of the paper. At the examination centre, the concerned authority is given two one-time passwords (OTPs)— one to decrypt the document and the other to download the copy.

At present SRPD is used for a few under-graduate engineering and pharmacy courses along with management courses in the colleges in Sangli, Satara and Kolhapur districts.

He added that the examination department had implemented the SRPD system for engineering on October 2012 on an experimental level. It was further to the pharmacy subjects in March 2013.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 FEB 2018
Times of India

# SUK convocation likely by month-end

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) has invited Lok Sabha Speaker Sumitra Mahajan to be the chief guest for its 54th convocation ceremony, which is likely to take place later this month.

Director of board of examinations and evaluations Mahesh Kakade said an official communication has been made with the Speaker a few weeks ago and that she has given her consent to be present at the ceremony. However, the confirmation for dates is yet to be received.

SUK vice-chancellor Devanand Shinde, who is also heading the Mumbai University, will be busy in Mumbai University's convocation which is also likely be held later this month. So, the SUK may schedule the event for February last week.

Kakade said once the date is finalised, arrangements for the ceremony will not be a problem. This year, the varsity has received over 54,000 convocation applications, the highest till date.

The university had conferred over 50,000 degree certificates at the 53rd convocation ceremony. The number of degrees conferred then was the highest till date for the university.

13 FEB 2018 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रनिर्मितीत बाबासाहेबांचे सर्वाधिक योगदान

## डॉ. पाटणकर : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर, ता. १२ : भारताला राज्यघटनेच्या माध्यमातून राष्ट्र म्हणून एकीकृत करण्याचे महान कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले, त्यामुळे हे राष्ट्र विकास पावत राहील, याची तरतूदही घटनेत आहे. हेच बाबासाहेबांचे भारताचे राष्ट्रनिर्माता म्हणून सर्वाधिक मोलाचे योगदान आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. भारत पाटणकर यांनी आज येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे 'आधुनिक भारताच्या उभारणीत राष्ट्रनिर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान' विषयावर आयोजित दोनदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ विचारवंत डॉ. गेल ऑम्व्हेट यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन झाले.

डॉ. पाटणकर म्हणाले, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताची घटना अशा पद्धतीने लिहिली, की ज्यात राष्ट्रनिर्मिती व राष्ट्रउभारणीची प्रक्रिया निरंतर होत राहील, अशी व्यवस्था आहे. जगातील अन्य कोणत्याही देशाच्या घटनेत अशी तरतूद नाही. भारतीय समाजातील जात, धर्म, पंथ, लिंग आदींच्या आधारावर प्रस्थापित झालेल्या शोषण व्यवस्थेचा अंत करण्याच्या दृष्टीने राज्यघटनेत जागा निर्माण करून देण्याचे कार्य बाबासाहेबांनी केले. त्याचप्रमाणे भगवान बुद्धांच्या समता, स्वातंत्र्य व बंधुता या तत्त्वांच्या आधारावरच त्यांनी राज्यघटनेची पर्यायाने या राष्ट्राची उभारणी केली. प्रेम व करुणा या बुद्धांनी सांगितलेल्या मूलभूत तत्त्वांखेरीज एकात्म राष्ट्राची उभारणी अशक्य आहे, याची जाणीव बाबासाहेबांना होती. म्हणून त्यांनी त्यांचा समावेश घटनेत केला."

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "डॉ. बाबासाहेबांनी चारित्र्यसंपन्न समाजनिर्मितीचा आग्रह धरला. चारित्र्यसंपन्न विद्यार्थी घडविण्यासाठी त्यांनी ग्रंथांच्या सहवासात राहिले पाहिजे, असे त्यांचे मत होते. चारित्र्यसंपन्न समाजनिर्मितीसाठी त्या समाजातील शिक्षकही चारित्र्यसंपन्न व विनयशील असायला हवेत, यासाठी बाबासाहेब आग्रही होते."

केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी प्रास्ताविक केले. डॉ. गिरीश मोरे यांनी आभार मानले. धारवाड येथील डॉ. टी. ब्रह्मानंदन यांच्यासह अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव, प्रा. हरीश भालेराव, प्रा. विनय कांबळे, डॉ. भगवान माने, डॉ. राजन गवस, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. गौतम कांबळे यांच्यासह विविध अधिविभागांतील शिक्षक, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 FEB 2018
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात एम.बी.ए.च्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ एम. बी. ए. अधिविभागाचा माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात झाला. प्रास्ताविक डॉ. दीपा इंगवले यांनी केले. गंधाली खारगे यांनी आभार मानले. यावेळी संचालक डॉ. एच. एम. ठकार उपस्थित होते. मेळाव्याचे आयोजन हे एम.बी.ए. भाग दोनच्या विद्यार्थ्यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 FEB 2018
पुढारी

# न्यू कॉलेजमध्ये गुरुवारी डॉ. जयसिंगराव पवार यांचे व्याख्यान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ व न्यू कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार (दि.१५) रोजी 'मराठा इतिहास' व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानमालेत ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार हे 'शिवछत्रपतींची स्वराज्याची संकल्पना' या विषयावर बोलणार आहेत. श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन डी. बी. पाटील हे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. इतिहासप्रेमींनी व्याख्यानमालेस उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. एन.व्ही.नलवडे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 FEB 2018
तरुण भारत

# ‘शिवछत्रपतींची स्वराज्याची संकल्पना’ विषयावर गुरुवारी व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि न्यू कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने ‘मराठा इतिहास’ व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. गुरुवारी (दि.१५) सकाळी १०.३० वाजता ‘शिवछत्रपतींची स्वराज्याची संकल्पना’ या विषयावर हे व्याख्यान होणार आहे. शिवाजी पेठेतील प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगच्या हॉलमध्ये होणाऱ्या व्याख्यानात ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगचे चेअरमन डी. बी. पाटील असणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 FEB 2018
लोकमत

# जयसिंगराव पवार यांचे गुरुवारी व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ व न्यू कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी (दि. १५) 'मराठा इतिहास' या व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. या अंतर्गत ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे 'शिवछत्रपतींची स्वराज्याची संकल्पना' या विषयावर व्याख्यान होणार आहे. प्रिन्स शिवाजी बोर्डिंग हाऊसचे चेअरमन डी. बी. पाटील हे अध्यक्षस्थानी आहेत. व्याख्यानाचा लाभ घेण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. एन. व्ही. नलवडे यांनी केले आहे.